**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक २५ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **भारतीय चिकित्सा पद्धती प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी शेगाव इथं आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळावा एक सशक्त माध्यम म्हणून काम करेल असा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केला विश्वास.**
2. **राज्यातल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जुलै २०२५ पासून ३ टक्के वाढ.**
3. **ब्रह्माकुमारीज संस्थेच्या राज्यस्तरीय अभियानाचा नागपूरच्या विश्वशांती सरोवर परिसरात आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत शुभारंभ.**
4. **नागपूरसह विदर्भाच्या अनेक जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता.**

---

**राष्ट्रपती-आयुष्य मेळा**

आयुर्वेदिक आणि इतर भारतीय चिकित्सा पद्धती प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव इथं आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळावा एक सशक्त माध्यम म्हणून काम करेल असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या महाराष्ट्र दौऱ्याचा आज दुसरा दिवस असून, बुलडाणा जिल्हयात शेगाव इथं आरोग्य मेळ्याचं उद्‌घाटन, त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. स्वस्थ नागरिक सशक्त देश बनवण्यासाठी महत्त्वाची भूमिका निभावतात असं प्रतिपादन मुर्मू यांनी यावेळी केलं.

***(होल्ड बाईट - राष्ट्रपती - ३६ सेकंद)***

राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी छोट्या छोट्या दुखण्यांसाठी घरगुती उपचार पद्धतीचा अवलंब करण्याचा तसंच व्यायामाचा सल्ला दिला. आयुष पर्यटनावर भर देण्याची गरज, केंद्रीय आयुष राज्यमंत्री, प्रतापराव जाधव यांनी यावेळी व्यक्त केली. २८ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या चार दिवसीय राष्ट्रीय

आरोग्य मेळ्यात आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी उपचार पद्धतीतला मोफत वैद्यकीय सल्ला, तपासण्या आणि औषधं उपलब्ध करून दिली जाणार आहेत. औषधी वनस्पतींची लागवड आणि कृषी वनीकरणाच्या माध्यमातून, आयुष पद्धतींबाबत जनजागृती करणे, सर्वसमावेशक आरोग्यसेवा पुरवणे आणि शेतकऱ्यांसाठी नव्या रोजगाराच्या संधी निर्माण करणं हा या मेळ्याचा उद्देश आहे.

-----------------------------------

**विधी मंडळ/महागाई भत्ता**

राज्यातल्या शासकीय आणि इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात, जुलै २०२५ पासून 3 टक्के वाढ करून 55 वरून 58 टक्क्यावर नेण्याचा निर्णय, राज्य सरकारनं घेतल्याची घोषणा, राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी, विधान परिषदेत केली. याचा लाभ 5 लाख 16 हजार कार्यरत कर्मचाऱ्यांना, तर 8 लाख 72 हजार निवृत्त कर्मचाऱ्यांना होईल, अशी माहिती त्यांनी दिली. फेब्रुवारी 2026 पासून हा निर्णय लागू होईल, जुलै ते ऑक्टोबर 2025 ची थकबाकी गुढीपाडव्यानिमित्त मार्च 2026 मध्ये दिली जाईल, तर नोव्हेंबर 2025 ते जानेवारी 2026 च्या थकबाकीबाबत वेगळा आदेश निर्गमित केला जाईल, असं त्यांनी सांगितलं. ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा सविस्तर आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

***(व्हॉइस कास्ट - नम्रता)***

***शिवशाही वाहनं वारंवार बिघडत असल्यानं, तसंच प्रवाशांचा प्रतिसाद कमी असल्यानं शिवशाही वाहनांचं रूपांतर निमआराम आणि साध्या वाहनांमध्ये करण्यात येणार असल्याची माहिती, सरकारनं आज विधान परिषदेत लेखी उत्तरादाखल दिली. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या कार्यालयावर भ्रष्टाचारविरोधी पथकानं छापा टाकल्याचा मुद्दा, सभागृहात चर्चेला घेण्याची सूचना फेटाळल्याची माहिती सभापतींनी दिली. याच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. गदारोळातच सभापतींनी लक्षवेधी सूचना पुकारल्या. त्यानंतर विरोधकांनी सभात्याग केला. रोजगार हमी योजनेतल्या कोणत्याही रोजगार सेवकाला कामावरून कमी केलं जाणार नाही, असं मंत्री, भरत गोगावले यांनी आज विधान सभेत स्पष्ट केलं.***

*मागणीनुसार काम देण्याचं धोरण कायम राहील आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही, असं ते म्हणाले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील थकीत निधीमुळे महाराष्ट्रातील तब्बल ३ लाख १२ हजार कामे बंद पडली असून, मजुरांच्या हाताला काम उरलेले नाही, असा आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केला. ऑनलाईन गेम्स आणि मोबाईलच्या व्यसनामुळे बालकांचं मानसिक, शैक्षणिक, सामाजिक आरोग्य धोक्यात आल्यासंदर्भात आमदार निरंजन डावखरे आणि संजय केणेकर यांनी लक्षवेधी सूचना मांडल्या. त्यावर, ऑनलाईन गेमिंगबाबत सरकार गंभीर असून, त्यासाठी २ फेब्रुवारी २०२६ रोजी एक कृती दल स्थापन केल्याची माहिती, माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी दिली. चंद्रपूर जिल्ह्यातल्या एका शेतकऱ्याकडून कर्ज वसूल करण्यासाठी त्याला, मूत्रपिंड विकायला लावल्याप्रकरणाची चौकशी करून, दोषींवर कारवाई करू असं आश्वासन, गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी, विधान सभेत सांगितलं. अतुल भातखळकर, विजय वडेट्टीवार, नितीन राऊत यांनी लक्षवेधी सूचनेमध्ये हा मुद्दा उपस्थित केला. मासिक पाळीच्या काळात महिलांना रजा मिळण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निर्देशानुसार एक समिती नेमण्यात येईल आणि त्यानुसार निर्णय घेतला जाईल असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज विधान सभेत सांगितलं. जितेंद्र आव्हाड यांनी याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. दरम्यान राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे, शाळा बंद पडत आहेत, पण यातला एकही मुद्दा राज्यपालांच्या अभिभाषणात आला नाही अशी टीका कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. तर राज्यात बेरोजगारीत वाढ होत असून, देशाच्या अर्थव्यवस्थेत राज्याचा वाटा कमी होत असल्याचं राज्यपालांनी कबूल केल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील म्हणाले. राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावरील चर्चेत ते विधानसभेत बोलत होते. राज्यात अमली पदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणात होत असून तरुण पिढी व्यसनात अडकली आहे, याला सरकारने पायबंद घालावा अशी मागणी त्यांनी केली. शिवसेना आमदार निलेश राणे आणि कॉंग्रेस नेते अमिन पटेल यांनीही*

*राज्यात अमली पदार्थांचा प्रश्न गंभीर बनल्याचं सांगितलं. (आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके)*

----------------------------------

**पाशा पटेल**

सध्याच्या शेतीसमोरील, विविध आव्हानांच्या पार्श्वभूमीवर, कृषी विद्यापीठांनी, मध्यवर्ती भूमिका, अधिक प्रभावीपणे पार पाडावी आणि आत्मनिर्भर देशनिर्मितीत शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून, उत्पादन खर्च आणि विपणन दरातील तफावत कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, असं प्रतिपादन कृषीतज्ञ पाशा पटेल यांनी केलं. महाराष्ट्र सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चर इकॉनॉमिक्स तसंच, कृषी अर्थशास्त्र आणि सांख्यिकी विभाग, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्या संयुक्त विद्यमानं आयोजित, भारताचे कृषी भविष्य, लवचीकता, शाश्वतता आणि सर्वसमावेशक विकासाचे मार्ग या दोन दिवसीय, राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी, ते बोलत होते.

----------------------------------

**राष्ट्रपती-ब्रह्मकुमारी, नागपूर**

महाराष्ट्रात सामाजिक एकता, परस्पर विश्वास आणि सकारात्मक मूल्ये, अधिक बळकट करण्याच्या उद्देशानं, ब्रह्मकुमारीज संस्थेच्या “एकता आणि विश्वासातून महाराष्ट्राचा सुवर्णकाळ” या राज्यस्तरीय अभियानाचा शुभारंभ, जामठा इथल्या विश्व शांती सरोवर परिसरात, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत होत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, ब्रह्मकुमारीज मुख्यालय माउंट आबूचे राजयोगी, बी.के. मृत्युंजय भाई आणि राजयोगिनी बी.के.चंद्रिका दीदी यांची, देखील कार्यक्रमाला उपस्थिती आहे. या अभियानांतर्गत व्यसनमुक्त समाज, संतुलित जीवनशैली, स्वच्छता, मूल्याधिष्ठित शिक्षण, योग, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक सलोखा यावर भर देण्यात येणार आहे. या परिसरात होणारी गर्दी लक्षात घेता सुरक्षा नियंत्रणाच्या दृष्टीनं, नागपूर, जबलपूर, भंडारा, अमरावती आणि वर्धा या मार्गावरील वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. दरम्यान, काही वेळापूर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं नागपुरात आगमन होताच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर निता ठाकरे यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं.

----------------------------------

**सुधीर मुनगंटीवार**

गडचिरोली जिल्ह्यातील ऐतिहासिक, मार्कंडेश्वर शिवमंदिर संवर्धन आणि परिसर विकासाची कामे मिशन मोडवर राबवून, २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश, आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. मंत्रालयात झालेल्या बैठकीत, विकास कामांचा साप्ताहिक आढावा घेण्यासाठी, त्रि-सदस्यीय समिती स्थापन करण्याचे आदेश देण्यात आले. मंदिर परिसरात, अतिक्रमण रोखणे, शास्त्रशुद्ध पुन:निर्माण आणि पर्यटनदृष्ट्या सर्वांगीण विकासावर भर देण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

----------------------------------

**होळी विषयक सूचना**

होळी आणि रंगपंचमी दरम्यान संभाव्य अपघात टाळण्यासाठी महावितरणनं नागरिकांना वीज सुरक्षेचे नियम पाळण्याचे आवाहन केलं आहे. नागपूर परिमंडलात, होळी पेटवताना वीज वाहिन्या, रोहित्र आणि भूमिगत केबल्सपासून सुरक्षित अंतर ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. रंगपंचमी दरम्यान ओल्या हातांनी वीज उपकरणांना स्पर्श टाळावा तसंच पाणी वीज खांबाजवळ साचू देऊ नये असं, महावितरणनं, स्पष्ट केल. कोणतीही दुर्घटना किंवा वीजपुरवठा खंडित झाल्यास तात्काळ टोल फ्री क्रमांक-18002333435 यावर संपर्क साधावा असं, आवाहन मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केलं.

----------------------------------

**अग्नीवीर**

अग्नीवीर आणि भारतीय लष्करातील कर्मचाऱ्यांना, सेवानिवृत्तीनंतर भारतीय रेल्वे सेवेत सामावून घेण्याबाबतचा, सामंजस्य करार केला जात आहे. भारतीय लष्कराच्या माहिती विभागाचे, अतिरीक्त महासंचालकांनी समाज माध्यमावर या संदर्भात माहिती दिली. सेवानिवृत्त लष्करी कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांना, सेवानिवृत्तीनंतर सन्मानानं आयुष्य जगता यावं, हा या मागचा उद्देश असल्याचं या संदेशात नमूद केलं आहे.

----------------------------------

**हवामान**

नागपूर, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये आज तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता, नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. उद्यापासून २८ तारखेपर्यंत हवामान कोरडं राहणार आहे. एक मार्च रोजी मात्र पुन्हा चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात तुरळक पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान नागपुरात आज सकाळपासून ढगाळ वातावरण असल्यानं, उकाडा निर्माण झाला आहे.

----------------------------------

**लोणार**

बुलढाणा जिल्ह्यातील जगप्रसिद्ध लोणार सरोवरात गोड्या पाण्याचा अचानक प्रवेश झाल्याने पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. यामुळे सरोवर परिसरातील कळमजा देवीमंदिर इथं पाणी साचल्यानं, मंदिर दर्शनासाठी बंद ठेवावे लागले. गोड्या पाण्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि मंदिर परिसराला लागून असलेली संरक्षण भिंत मंजूर करावी, या मागण्यांसाठी नागरिकांनी साखळी उपोषण सुरू केलं आहे. कळमजा भक्त परिवाराच्या वतीनं, प्रशासनानं तातडीनं उपाययोजना कराव्यात अशी मागणी, करण्यात येत आहे.

----------------------------------